# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 12 January 2026

## Time 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक १२ जानेवारी २०२६ दुपारी १.०० वा.

****

जर्मनीचे चॅन्सलर फ्रेडरिक मर्झ आजपासून भारत दौऱ्यावर असून, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांचं अहमदाबादमधल्या साबरमती आश्रमात स्वागत केलं. दोन्ही नेत्यांनी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांना पुष्प अर्पण करून आदरांजली वाहिली. मर्झ यांनी आश्रमात महात्मा गांधींचा चरखा पाहिला आणि अभिप्रायही नोंदवला. यानंतर दोन्ही नेते साबरमती नदीकाठच्या आंतरराष्ट्रीय पतंग महोत्सवात सहभागी झाले. भारत–जर्मनी राजकीय संबंधांची ७५ वर्षे आणि रणनैतिक भागीदारीची २५ वर्षे पूर्ण होत आहेत. दोन्ही नेत्यांमध्ये गांधीनगर इथं द्विपक्षीय बैठक सुरु असून, व्यापार, गुंतवणूक, तंत्रज्ञान, शिक्षण, यासह विविध क्षेत्रांतल्या सहकार्यासंबंधी चर्चा करण्यात येत आहे.

****

भारतीय अंतराळ संशोधन संस्था – इस्रोने आज डीआरडीओच्या EOS – N1 पृथ्वी निरीक्षण उपग्रहाचं प्रक्षेपण केलं. हे प्रक्षेपण आंध्र प्रदेशातल्या श्री हरिकोटा इथल्या सतीश धवन अंतराळ केंद्रातून आज सकाळी पी एस एल व्ही–सी 62 रॉकेटद्वारे करण्यात आलं. मात्र या प्रक्षेपणात पीएस–3 स्टेज दरम्यान काही त्रुटी आढळल्या आहेत. याचं विश्लेषण सुरु असल्याची माहिती इसरोने दिली आहे.

****

देशातल्या मत्स्य उत्पादनात गेल्या वर्षांत १०६ टक्क्यांनी वाढ होऊन, ते १९ पूर्णांक ८ दशलक्ष टन इतकं झालं असल्याचं मत्स्यव्यवसाय, पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय मंत्रालयानं म्हटलं आहे. मत्स्यव्यवसाय आणि मत्स्यपालन क्षेत्र देशाच्या अर्थव्यवस्थेत महत्त्वाची भूमिका बजावत असून, यामुळे तीन कोटी मच्छीमार आणि मत्स्यपालन शेतकऱ्यांना रोजगार मिळाला आहे.

मत्स्यव्यवसायाच्या विकासासाठी शासनातर्फे विविध योजनांद्वारे ३२ हजार ७२३ कोटी रुपये मंजूर करण्यात आले असल्याचं मंत्रालयानं सांगितलं.

****

स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त आज राष्ट्रीय युवादिन साजरा केला जात आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वामी विवेकानंद यांना आदरांजली वाहिली.

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनीही स्वामी विवेकानंद यांना आदरांजली वाहून, राष्ट्रीय युवा दिनाच्या शुभेच्छा दिल्या. स्वामी विवेकानंदांनी देशातल्या तरुणांना ज्ञान, परंपरा, तत्त्वज्ञान आणि अध्यात्म यांच्याशी जोडलं आणि त्याची व्याप्ती जागतिक स्तरावर पोहोचवली  असल्याचं त्यांनी म्हटलं आहे.

दरम्यान, यानिमित्तानं नवी दिल्लीत आयोजित विकसित भारत युवा नेतृत्व संवाद कार्यक्रमाच्या समारोप सत्रात पंतप्रधान सहभागी होणार आहेत. यावेळी ते देशभरातून आलेल्या सुमारे तीन हजार तरुणांशी, तसंच आंतरराष्ट्रीय समुदायांच्या युवा प्रतिनिधींशी संवाद साधतील.

छत्रपती संभाजीनगर इथल्या रामकृष्ण मिशन आश्रमात युवक दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात जिल्हाधिकारी दिलीप स्वामी सहभागी झाले होते.

यवतमाळ जिल्ह्यात सामका आयुर्वेद इथं स्वामी विवेकानंद यांच्या अठरा फूट उंच पुतळ्याचं अनावरण आज करण्यात आलं. रामकृष्ण मठाचे अध्यक्ष स्वामी राघवेन्द्रानंद महाराज यावेळी उपस्थित होते.

****

राजमाता जिजाऊंची आज ४२८ वी जयंती आज उत्साहात साजरी होत आहे. बुलडाणा जिल्ह्यात सिंदखेडराजा इथं राजे लखुजी जाधव यांच्या राजवाड्यात असलेल्या जिजाऊंच्या जन्मस्थळी सूर्योदयाच्या वेळी केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते शासकीय महापूजा पार पडली. या पवित्र सोहळ्यासाठी राज्यभरातून शिवप्रेमी आणि जिजाऊ भक्त मोठ्या संख्येने सिंदखेडराजा इथं दाखल झाले आहेत. यावेळी राजे लखुजी जाधव यांचे वंशज शिवाजी जाधव, आमदार मनोज कायंदे यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.

****

गृहमंत्री अमित शहा यांनी राजमाता जिजाऊंना आदरांजली वाहिली. जिजाबाईंनी छत्रपती शिवाजी महाराजांना लहानपणापासूनच धैर्य, स्वाभिमान आणि स्वतःच्या

संस्कृतीचं रक्षण करण्याची शिकवण दिली आणि हिंदू स्वराज्य स्थापनेच्या संकल्पासाठी जागृत केलं, असं शहा यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबईत राजामाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं.

नांदेड इथल्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांनी, राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं.

****

छत्रपती संभाजीनगर शहरात राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. यात व्याख्याने, वाचन उपक्रम, स्वच्छता अभियान, वृक्षारोपण, गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचं वाटप करण्यात येत आहे. तसंच विविध शाळेतल्या विद्यार्थ्यांनी स्वामी विवेकानंदांचे विचारफलक हातात घेऊन जनजागृती फेरी काढली. तसंच युवकांची दुचाकी, चारचाकी वाहन फेरी देखील काढण्यात आली.

****

दिल्लीत आज तापमानात लक्षणीय घट झाली असून, दोन पूर्णांक नऊ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. सर्वांत कमी एक पूर्णांक एक अंश सेल्सिअस तापमान अमृतसर इथं, तर राजस्थानात चुरूमध्ये एक पूर्णांक तीन अंश सेल्सिअस तापमान नोंदवलं गेलं.

****